| MHKO180008412025 | **संक्षीप्त फौजदारी खटला क्र.४३४/२०२५**<br>महाराष्ट्र सरकार<br>**विरुद्ध**<br>मोहसिन सिराजुद्दीन पकाली व इतर |
|---|---|

**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, कुरूंदवाड यांचे न्यायालयात**
( पिठासीन अधिकारी : व्ही. आर. माने)

कुरूंदवाड पोलीस ठाणे गु.र.क्र.२३७/२०२५ तारीख १५/०६/२०२५. अंतिम अहवाल क्र.८२/२०२५. (आरोप - महाराष्ट्र जुगार (प्रतिबंधक) कायदा कलम १२(अ) अन्वये.)

**नि.क्र.१८/ब.**

| | |
|---|---|
| **अभियोग पक्ष** | महाराष्ट्र सरकार तर्फे<br>प्रभारी पोलीस अधिकारी<br>कुरूंदवाड पोलीस ठाणे. |

| | |
|---|---|
| अभियोग पक्षातर्फे :- | विशेष सहायक सरकारी अभियोक्ता श्री. नदाफ. |

| | | |
|---|---|---|
| **आरोपी** | १. | मोहसिन सिराजुद्दीन पकाली,<br>वय : ३४ वर्षे, धंदा : मजूरी,<br>राहणार: गावभाग गवठे गुलंद, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर. |
| | २. | गजानन संगाप्पा कराळे,<br>वय : ३५ वर्षे, धंदा : शेती,<br>राहणार: कागवाड, ता. कागवाड, जि. बेळगांव. |
| | ३. | प्रविण बाबू कवटगे,<br>वय : ३० वर्षे, धंदा : निवृत्त,<br>राहणार: कागवाड, ता. कागवाड, जि. बेळगांव |
| | ४. | प्रमोद राजगोंडा रुगे<br>वय : ४२ वर्षे, धंदा : शेती,<br>राहणार: भोज, ता. निपाणी, जि. बेळगांव. |

| | |
|---|---|
| आरोपी तर्फे विद्वान विधीज्ञ :- | श्री. एम. आर. आवळे |

| | |
|---|---|
| **गुन्हा घडला तारीख** | १५/०६/२०२५ |
| **प्रथम खबर तारीख** | १५/०६/२०२५ |
| **दोषारोपपत्र दाखल तारीख** | ०६/१२/२०२५ |
| **दोषारोप ठेवल्याची तारीख** | ०४/०६/२०२६ |
| **पुरावा सुरू झाल्याची तारीख** | ०४/०६/२०२६ |
| **न्यायनिर्णय आरक्षीत केल्याची तारीख** | --- |
| **न्यायनिर्णय जाहीर तारीख** | २४/०७/२०२६ |
| **शिक्षा झाली असल्यास, त्याची तारीख.** | --- |

## आरोपीचा तपशील

| आरोपी क्र. | आरोपीचे नांव | अटकेची तारीख | जामीनाची तारीख | दोषारोप | शिक्षा झाली अथवा निर्दोष मुक्त केले | शिक्षा | फो.प्र.सं. कलम ४२८ अंतर्गत प्रकरणाच्या सुणावनीदरम्यान कोठडीत व्यतित केलेला कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १.<br>२.<br>३.<br>४. | मोहसिन सिराजुद्दीन पकाली,<br>गजानन संगाप्पा कराळे,<br>प्रविण बाबू कवटगे,<br>प्रमोद राजगोंडा रुगे | भा.ना.सु. संहिता कलम ३५(३) प्रमाणे नोटीस | सर्व आरोपी ०४/०६/२०२६ | महा. जुगार कायदा कलम १२-अ. | सर्व आरोपी निर्दोष मुक्त | -- | -- |

## अभियोग पक्षाचे साक्षीदार

| **साक्षीदार क्रमांक** | **नांव** | **साक्षीदाराचा प्रकार**<br>(प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ञ साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, स्वतंत्र साक्षीदार) |
|---|---|---|
| १ | मोहन शांतीनाथ मानगावे | पंच साक्षीदार |

**बचाव पक्षाचे अथवा न्यायालयीन साक्षीदार : काही नाही.**

## अभियोग पक्षातर्फे निशाणी यादी

| **अ.क्र.** | **निशाणी क्र.** | **तपशील** |
|---|---|---|
| ०१ | १५ | जप्ती पंचनाम्यावरील पंचाची सही |

**बचाव पक्षाचे/न्यायालयाचे/वस्तू निशाणी यादी : काही नाही.**

## न्यायनिर्णय

( जाहीर दिनांक २४ जुलै, २०२६ )

आरोपी क्र.१ ते ४ हे महाराष्ट्र जुगार (प्रतिबंधक) कायदा कलम १२-अ खालील गुन्ह्यासाठी संपरीक्षाधिन आहेत.

**अभियोग पक्षाचे थोडक्यात कथन असे की :-**

०२. दिनांक १५/०६/२०२५ रोजी सायं. ०४:०५ वा. च्या सुमारास गणेशवाडी, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर येथील गाताडे मळ्याजवळील जमादार यांचे शेतातील पत्र्याच्या शेडच्या आडोशाला उघड्यावर आरोपी क्र.१ ते ४ हे त्यांच्या फायद्याकरीता पैशांची बाजी लाऊन तीन पानी पत्यांचा जुगार खेळत असताना मिळून आले. पोलीसांनी आरोपींवर छापा टाकून त्यांना पकडले असता त्यांच्या ताब्यातून रोख रक्कम रु.७,०००/-, जुगाराचे साहित्य, मोबाईल फोन आणि दुचाकी वाहने मिळून आलीत. सबब, सदर घटनेची फिर्याद कुरूंदवाड पोलीस ठाण्याचे पोलीस नाईक आर. एस. सानप यांनी दिली.

०३. सदर फिर्याद नुसार आरोपीविरुद्ध महाराष्ट्र जुगार (प्रतिबंधक) कायदा कलम १२-अ अन्वये कुरूंदवाड पोलीस ठाण्यात गु.र.क्र.२३७/२०२५ नोंदवण्यात आला. पोलीस कॉन्स्टेबल एस. व्ही. खाडे यांनी गुन्ह्याचा तपास करुन तपासाअंती आरोपींविरुद्ध न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

०४. आरोपी क्र.१ ते ४ यांचेवर आरोप (नि.१३) निश्चित करुन ते त्यांना वाचून दाखवले व समजून सांगीतले असता त्यांनी आरोप नाकारुन संपरीक्षेची मागणी केली. संपरिक्षेदरम्यान, अभियोग पक्षातर्फे पंच मोहन शांतीनाथ मानगावे यांची साक्ष नोंदवली. इतर साक्षीदारांची हजेरी बरेच प्रयत्न करुनही साध्य झालेली नाही. करीता, सहायक सरकारी अभियोक्ता यांच्या तोंडी विनंतीवरुन अभियोग पक्षाचा पुरावा बंद करण्यात आला. अभिलेखावर आरोपींविरुद्ध पुरेसा पुरावा आला नसल्याने आरोपींचा भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम ३५१ नुसार जबाब नोंदवले नाही.

०५. सहाय्यक सरकारी अभियोक्ता आणि आरोपींच्या वकीलांचा युक्तीवाद ऐकला. पुढील मुद्दे निर्णीतीसाठी उपस्थित होतात. त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेसहीत खालीलप्रमाणे :

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | दि.१५/०६/२०२५ रोजी सायं.०४:०५ वा. च्या सुमारास गणेशवाडी, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर येथील गाताडे मळ्याजवळील जमादार यांचे शेतातील पत्र्याच्या शेडच्या आडोशाला उघड्यावर आरोपी क्र.१ ते ४ हे त्यांच्या फायद्याकरीता पैशांची बाजी लाऊन तीन पानांचा पत्यांचा जुगार खेळताना मिळून आल्याचे अभियोग पक्षाने सिद्ध केले काय ? | ...नकारार्थी. |
| २. | काय आदेश ? | सर्व आरोपींना निर्दोष मुक्त केले. |

<u>कारणमिमांसा</u>

०६. आरोपींवरील आरोप सिद्धतेसाठी अभियोग पक्षाला ही बाब संशयापलिकडे शाबीत करणे आवश्यक आहे की, आरोपी हे त्यांच्या फायद्याकरीता पैशांची बाजी लाऊन तीन पानांचा पत्यांचा जुगार खेळताना आढळून आले.

<u>मुद्दा क्र.१ व २ करीता :-</u>

०७. अभियोग पक्षातर्फे एक पंच साक्षीदार मोहन शांतीनाथ मानगावे यांना तपासले आहे. सदर पंचाने असे कथन केले की, त्याला दि.१५/०६/२०२५ रोजी कुरूंदवाड पोलीसांनी पोलीस ठाण्यात बोलवले व तेथे त्याची सही घेतली. तो तेथून पोलीसांसोबत कोठेही गेला नाही. त्याच्या समक्ष त्यावेळी कोणतीही व कसलीही कारवाई झाली नाही. त्याच्यासमक्ष कसलीही जप्ती करण्यात आली नाही. पंचनाम्यावरील सही त्याने मान्य केली. परंतु, पंचनाम्यातील मजकूराबाबत अनभिज्ञता दर्शविली. सदर पंचाला फितूर घोषीत करुन त्यास उत्तरसूचक प्रश्न विचारुन अभियोग पक्षातर्फे उलटतपास घेण्यात आला. परंतु, त्यामध्येही त्याने त्यांचे समक्ष जुगाराचे साहित्य व रोख रक्कम जप्त करुन पंचनामाकेल्याचे स्पष्टपणे नाकारले आहे. अभियोग पक्षाने याकामी

फिर्यादी, तपासी अंमलदार किंवा पंचनामा करणारे पोलीस यांची साक्ष नोंदवलेली नाही.

०८. प्रस्तुत प्रकरणात अभिलेखावरील पुराव्याचे अवलोकन करता, घटनास्थळ हे सार्वजनिक ठिकाण असल्याचे व आरोपींच्या ताब्यात रोख रक्कम, जुगाराचे साहित्य, दुचाकी वाहने आढळून आल्याचे तसेच आरोपी कथीत ठिकाणी व समयी स्वतःच्या फायद्याकरीता पैशांची बाजी स्विकारुन तीन पानी पत्त्यांचा जुगार खेळत होते हे सिद्ध होण्याइतपत विश्वसनीय पुरावा उपलब्ध नाही.

०९. या प्रकरणात फिर्याद, घटनास्थळ व जप्ती पंचनामे शाबीत झालेले नाहीत. त्यामुळे आरोपींच्या ताब्यातून झालेली जप्ती सिद्ध झालेली नाही. तसेच, घटनास्थळ हे सार्वजनिक ठिकाण किंवा ते आजूबाजूची जागा असल्याचे देखील निःशंकपणे शाबित झालेले नाही. त्यामुळे, आरोपी हे सार्वजनिक ठिकाणी पैशाची बाजी लाऊन जुगार खेळत असल्याचे सिद्ध करण्यास अभियोग पक्ष अयशस्वी ठरला आहे.

१०. आरोपींविरुद्ध कोणताही थेट असा दोषदर्शक पुरावा अभिलेखावर आलेला नाही. आरोपी हे स्वतःच्या अर्थिक फायद्यासाठी जुगार खेळत असल्याचे अभियोग पक्षाचे कथन निःशंकपणे शाबित झालेले नाही. करीता, संशयाचा फायदा आरोपींच्या हक्कात जाऊन ते निर्दोष सुटण्यास पात्र ठरतात. सबब, मुद्दा क्र.१ चे उत्तर नकारार्थी देऊन मुद्दा क्र.२ करीता मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे:

## आ दे श

१) आरोपी क्र.१ मोहसिन सिराजुद्दीन पकाली, क्र.२ गजानन संगाप्पा कराळे, क्र.३ प्रविण बाबू कवटगे व क्र.४ प्रमोद राजगोंडा रुगे यांना महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायदा कलम १२(अ) च्या आरोपातून भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम २७८(१) अन्वये निर्दोष मुक्त करण्यात येते.

२) आरोपींचे बंधपत्र रद्द करण्यात येते.

३) आरोपींनी भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम ४८१ अन्वये प्रत्येकी रु.१५,०००/- नविन जामीन व बंधपत्र या न्यायालयात दाखल करावा.

४) प्रकरणात जप्त मुद्देमालातील एकूण रोख रक्कम रु.७,०००/- अपिल कालावधीनंतर सरकार जमा करावी. दुचाकी वाहने व मोबाईल अपिल कालावधीनंतर मूळ मालकांच्या ताब्यात देणेत यावीत. इतर जप्त मुद्देमाल जुगाराचे साहित्य हे मुल्यहिन दर्शविल्याने ते अपिल कालावधीनंतर नाश कराण्यात यावे.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत करण्यात आला.)

Digitally signed by MANE VAISHNAVI ROHAN
Date: 2026.07.24 16:12:43 +0530

ठिकाण: कुरूंदवाड. ( व्ही. आर. माने )
दिनांक : २४/०७/२०२६. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, कुरूंदवाड.